# मराठी भाषा आणि साहित्य विभाग

इस्माईल युसूफ महाविद्यालयातील मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळातर्फे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ह्या वर्षात अनेक अभ्यासपूरक उपक्रम राबविण्यात आले. मराठी वाङ्मय मंडळ दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रम, स्पर्धा आणि उपक्रमांचे आयोजन करीत असते. मराठी वाङ्मय मंडळातर्फे १ जानेवारी २०१८ ते १५ जानेवारी २०१८ या कालावधीत 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' तसेच दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी 'मराठी भाषा गौरव दिन ' साजरा करण्यात आला.

**निबंध स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धेचे आयोजन गुरुवार,दिनांक ११ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले होते. प्रस्तुत निबंधस्पर्धेत मराठी भाषेसंदर्भातील विविध विषयांवरील निबंध विद्यार्थ्यांनी लिहिले . ह्या निबंधस्पर्धेत एकूण २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला .

**ग्रंथ परीक्षण स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी ग्रंथ परीक्षण स्पर्धेचे आयोजन शुक्रवार,दिनांक १२ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

**काव्य रसग्रहण स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्य रसग्रहण स्पर्धेचे आयोजन शनिवार.दिनांक १३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण २२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला .

**सर्जनशील लेखन स्पर्धा :**

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सर्जनशील लेखन स्पर्धेचे आयोजन शनिवार,दिनांक १३ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १० वाजता करण्यात आले होते. ह्या उपक्रमात एकूण २० विद्यार्थ्यांनी स्वरचित कविता आणि कथा लिहून सहभाग नोंदवला.

**काव्यवाचन** :

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन उपक्रमाचे आयोजन सोमवार ,दिनांक १५ जानेवारी २०१८ रोजी सकाळी १० वाजता भाषाभवन येथे करण्यात आले होते. प्रस्तुत काव्यवाचन उपक्रमात मराठी भाषेतील विविध विषयांवरील कविता विद्यार्थ्यांनी सादर केल्या. ह्या काव्यवाचन उपक्रमात एकूण १९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**मराठी भाषा गौरव दिन :**

मराठी विभागातर्फे सोमवार,दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी कवी कुसुमाग्रज जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते . ह्या कार्यक्रमात विविध विद्यार्थ्यांनी काव्यवाचन सादर केले . मराठी भाषा संवर्धन आणि कवी कुसुमाग्रज ह्यांच्याबद्दल मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले. याप्रसंगी मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांतील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

पूजा वाघमोडे,राकेश मोरे,हना शेख, सय्यद गौस,ओमकेश लहांगे,ओमकार नलावडे,निलेश खताते,तुषार जाधव,रोहन खंदारे,दिशा पाटील,रोहिणी डफळे,इरफान शेख,मेहबूब शेख,सारिका जगताप आणि पूनम शिरोडकर आदी विद्यार्थ्यांचा वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमात उत्तम सहभाग राहिला.

**प्रा. समीर रामचंद्र वैरागी**
**मराठी विभागप्रमुख.**